**Press Release**



## State Tourism Ministers Conference: Goa urges Union Tourism Ministry to ease out visa processes for tourists, GTDC to launch Tourism App for tourists, seeks central assistance to improve facilities for pilgrims visiting Old Goa

Panjim, August 20: Goa Tourism, on Tuesday, requested the Union Ministry for Tourism for easing of e- tourist visa processes at the Goa International Airport, Dabolim, under the E-Tourist Visa Facility for foreign nationals opting for Goa as the Port of Arrival.

Speaking at the National Conference for State Tourism Ministers held in the national capital today, Mr. Dayanand Sopte, Chairman of GTDC, who led the Goa delegation, also updated the Union Ministry regarding Goa's plans for launching of a Goa Tourism App for tourists which will serve as a platform for information, grievance redressal, bookings etc.

During the day-long conference, the Goa Tourism delegation participated in various workshops, deliberations and presented reports on various aspects concerning tourism and infrastructure development in the State.

Mr. Sopte also urged the Union Ministry for Tourism to sanction funds for development of Old Goa churches under PRASHAD SCEHME and requested Director General - ASI, Mrs. Usha Sharma to ensure that ASI grants timely permissions to all projects so that all facilities for pilgrims and tourists can be created through central assistance. Goa Tourism also briefed delegates about steps taken in the field of adventure tourism where Goa is emerging as a national leader. Thanks to a slew of initiatives launched by GTDC in the recent past such as White Water Rafting, Bungee Jumping, Scuba-diving, Electric bicycle tours, Motorized Paragliding etc.

Earlier in the day, the Hon'ble Minister of State for Tourism and Culture, Mr. Prahlad Singh Patel addressed the Conference. The Secretary, Ministry of Tourism, Govt. of India, Mr. Yogendra Tripathi also spoke. This was followed by the Sadhbhavana Diwas Pledge taken by all state dignitaries.
A Hindi version of Incredible India website was launched by the Hon'ble Minister of State for Tourism and Culture, Mr. Patel who thereafter handed over MoUs and LoIs signed under the Adopt a Heritage Program. A session showcasing the Incredible India tourist facilitator certification programme and best practices in tourism sector and social media campaigns by two selected State governments were also organized at the Conference.

Some of the other sessions at the conference today included topics on 'Developing India as a tourist friendly destination, developing an all encompassing One Stop Solution including information on tourism related services through a web based application and a Grievance Redressal Mechansim through twitter and tourist helpline, sharing information on adventure and B&B/Home stay guidelines & development of tourism infrastructure under the Swadesh Darshan and PRASHAD schemes.'

Presentations were made on adventure tourism and Bed & Breakfast/Home stay scheme guidelines and on status of projects sanctioned under the Swadesh Darshan and PRASHAD schemes and implementation of Public Financial Management Systems (PFMS).

प्रेस रीलीज




# राज्य पर्यटन मंत्री परिषद – पर्यटकांसाठी व्हिसा प्रक्रिया शिथिल करण्याची गोव्याची केंद्रीय पर्यटन मंत्रालयाला विनंती, पर्यटकांसाठी जीटीडीसी लाँच करणार पर्यटन अप, जुन्या गोव्याला भेट देणाऱ्या भक्तांसाठीच्या सुविधा अद्यावत करण्यासाठी केंद्राकडून सहकार्याची विनंती

पणजी, 20 ऑगस्ट – गोवा टुरिझमने मंगळवारी केंद्रीय पर्यटन मंत्रालयाला दाबोलिम येथील गोवा आंतरराष्ट्रीय विमानतळावर गोव्यात आगमन केल्यानंतर व्हिसा घेणाऱ्या परकीय नागरिकांसाठी असलेल्या ई- टुरिस्ट व्हिसा सुविधेअंतर्गत ई टुरिस्ट व्हिसा प्रक्रिया शिथिल करण्याची विनंती केली.

आज दिल्लीत झालेल्या राज्य पर्यटन मंत्र्यांच्या राष्ट्रीय परिषदेत गोव्याच्या प्रतिनिधी मंडळाचे प्रमुख आणि जीटीडीसीचे अध्यक्ष दयानंद सोपटे यांनी केंद्रीय मंत्रालयाला पर्यटकांसाठी गोवा पर्यटन अप लाँच करण्याच्या

गोव्याच्या योजनेचीही माहिती दिली. हे अप पर्यटकांसाठी माहिती, तक्रार निवारण आणि आरक्षणाचे व्यासपीठ असेल.

या एक दिवसीय परिषदेत गोवा पर्यटन प्रतिनिधी मंडळाने विविध कार्यशाळा, चर्चासत्रांत सहभागी होत पर्यटन तसेच राज्यातील पायाभूत सुविधांशी संबंधित विविध पैलूंवर अहवाल सादर केले.

श्री. सोपटे यांनी केंद्रीय पर्यटन मंत्रालयाला प्रशाद योजनेअंतर्गत जुन्या गोव्यातील चर्चच्या विकासासाठी निधी मंजूर करण्याची विनंती केली आणि संचालक जनरल – एएसआय, सौ. उषा शर्मा यांनी एएसआयद्वारे सर्व प्रकल्पांसाठी वेळोवेळी परवाने दिले जातील याची खात्री करण्याची विनंती केली, ज्यामुळे भक्तगण तसेच पर्यटकांसाठी सोयीसाठी केंद्रीय सहकार्याने आवश्यक सुविधा देता येतील.

गोवा टुरिझमने प्रतिनिधींना साहस पर्यटन क्षेत्रात राबवत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. या क्षेत्रात गोवा टुरिझम राष्ट्रीय आघाडी मिळवत आहे. जीटीडीसीने गेल्या काही काळात लाँच केलेल्या व्हाइट वॉटर राफ्टिंग, बंजी जंपिंग, स्कुबा डायव्हिंग, इलेक्ट्रिक बायसिकल टुर्स, मोटोराइज्ड पॅराग्लायडिंग अशा उपक्रमांमुळे हे शक्य झाले आहे.

दिवसाच्या सुरुवातीला माननीय राज्य पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री श्री. प्रल्हाद सिंग पटेल यांनी परिषदेला संबोधित केले. पर्यटन मंत्रालय, भारत सरकारचे सचिव श्री. योगेंद्र त्रिपाठी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर राज्यमान्यवरांनी सद्भावना दिवस शपथ घेतली. इनक्रेडिबल इंडिया संकेतस्थळाची हिंदी आवृत्तीही यावेळेस माननीय राज्य पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री श्री. पटेल यांनी लाँच केली व त्यानंतर अडॉप्ट अ हेरिटेज या उपक्रमाअंतर्गत सह्या करण्यात आलेले एमओयू आणि एलओआयचे हस्तांतरण केले. इनक्रेडिबल इंडिया टुरिस्ट फॅसिलिटेटर प्रमाणपत्र उपक्रम आणि पर्यटन क्षेत्रातील सर्वोत्तम पद्धती आणि दोन निवडक राज्य सरकारांचे सोशल मीडिया अभियान दर्शवणारे सत्र परिषदेदरम्यान आयोजित करण्यात आले होते.

परिषदेत आयोजित करण्यात आलेल्या इतर सत्रांमध्ये भारताचा पर्यटनस्नेही ठिकाण म्हणून विकास करणे, सर्वसमावेशक, पर्यटनाशी संबंधित सेवांची माहिती देणारे वेब आधारित अप्लिकेशन, ट्विटरद्वारे तक्रार निवारण यंत्रणा, पर्यटक हेल्पलाइन, साहस आणि बी अँड बी/होम स्टे मार्गदर्शक तत्वे यांविषयी माहिती, स्वदेश दर्शन आणि प्रशाद योजनेअंतर्गत पर्यटन पायाभूत सुविधांचा विकास यांची यांची माहिती यांचा समावेश होता.

साहस पर्यटन आणि बेड अँड ब्रेकफास्ट/होम स्टे योजना मार्गदर्शन, स्वदेश दर्शन आणि प्रशाद योजनेअंतर्गत पर्यटन पायाभूत सुविधांची प्रगती आणि पब्लिक फायनान्शियल मॅनेजमेंट सिस्टीम्स (पीएफएमएस) राबवण्याविषयी सादरीकरण करण्यात आले.